# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. एसईझेड बायो-टेकच्या हडपसर गाव, जिल्हा पुणे येथील जैव-तंत्रज्ञान आणि औषधनिर्माण क्षेत्राकरिता क्षेत्र-सापेक्ष विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०२४**

**विद्युत अधिनियम, २००३**

**क्र.मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/एसईझेड बायो-टेक/२०२४-२५/____:** विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१च्या उप-कलम (२) च्या खंड (डी) सह कलम १६ आणि कलम १४ च्या खंड (बी) मधील अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे खालील विनियम करीत आहे:-

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ**

या विनियमांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. एसईझेड बायो-टेकच्या हडपसर गाव, जिल्हा पुणे येथील जैव-तंत्रज्ञान आणि औषधनिर्माण क्षेत्राकरिता क्षेत्र-सापेक्ष विशेष आर्थिक क्षेत्राला लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०२४ असे म्हणावे.

१.२ हे विनियम भारत सरकार, वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, वाणिज्यिक विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र कक्ष), उद्योग भवन, नवी दिल्ली यांनी निर्गमित केलेल्या खालील एसईझेड अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रासाठी लागू राहतील;

| अनु. क्र. | राजपत्र अधिसूचनेचा तपशील | अधिसूचनेचा दिनांक | एसईझेडचे क्षेत्र हेक्टर्समध्ये |
|---|---|---|---|
| १ | राजपत्र अधिसूचना क्र. एस. ओ. १८३३ (ई) | २९ डिसेंबर, २००५ | २३.१७९३ |
| २ | राजपत्र अधिसूचना क्र. एस. ओ. २५०१ (ई) | ११ सप्टेंबर, २०१५ | (-१०.७६५७) *निरधिसूचित* |
| **एकूण क्षेत्र** | | | १२.४१३६ |

१.३ हे विनियम शासकीय राजपत्रात ज्या दिनांकास प्रसिध्द होतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२ व्याख्या :**

**२.१** या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर :-

(ए) **“अधिनियम”** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

(बी) **“सह-विकासक”**चा अर्थ, एसईझेड अधिनियम, २००५ च्या कलम २ च्या उप-कलम (एफ) अंतर्गत करण्यात आलेल्या व्याख्येप्रमाणे राहील.

(सी) **“विकासक”**चा अर्थ, एसईझेड अधिनियम, २००५ च्या कलम २ च्या उप-कलम (जी) अंतर्गत करण्यात आलेल्या व्याख्येप्रमाणे राहील.

(डी **“मानीव वितरण परवानाधारक”** म्हणजे सह-विकासक मे. एसईझेड बायो-टेक, ज्यांना भारत सरकारने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४९ अंतर्गत निर्गमित केलेल्या दि. ३ मार्च, २०१० च्या अधिसूचना क्र. एस.ओ.५२८ (ई) द्वारा विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ च्या खंड (बी) अंतर्गत, एसईझेड अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेचे संचालन व देखभाल करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे.

(इ) **“सर्वसाधारण अटी”** म्हणजे, वेळोवेळी अंमलात असलेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधारण अटी;

(एफ) **“मे. एसईझेड बायो-टेक”** म्हणजे मे. एसईझेड बायो-टेक सर्व्हिसेस प्रा. लि., जे कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत नोंदणीकृत झालेले आहेत आणि ज्यांना भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, वाणिज्यिक विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र कक्ष), उद्योग भवन, नवी दिल्ली यांनी दि. १६ ऑगस्ट, २००७ रोजीच्या मान्यता पत्रान्वये हडपसर गाव, जिल्हा पुणे येथील जैव-तंत्रज्ञान आणि औषधनिर्माण क्षेत्राकरिता क्षेत्र-सापेक्ष विशेष आर्थिक क्षेत्राला सह-विकासक म्हणून मान्यता दिलेली आहे.

(जी) **“एसईझेड अधिनियम”** म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५;

(एच) **“एसईझेड नियम”** म्हणजे वेळोवेळी अंमलात असलेले विशेष आर्थिक क्षेत्र नियम २००६;

२.२ (अ) या विनियमांत वापरलेल्या आणि ज्यांच्या व्याख्या करण्यात आलेली नाही अशा शब्द आणि उक्तींना, विद्युत अधिनियम, २००३ आणि विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम आणि विनियमांनुसार, अर्थ राहील;

(ब) या विनियमांच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी विनियमांमधील कोणत्याही शब्दांचा/ मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्भवल्यास आणि/किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील विनियम ग्राह्य धरण्यात येतील;

## ३ व्याप्ती

‘मे. एसईझेड बायो-टेक’च्या संदर्भातील या विशिष्ट अटी आणि आयोगाने अधिसूचित केलेल्या वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी या ‘मे. एसईझेड बायो-टेक’च्या वीज वितरण

परवान्याच्या अटी म्हणून मानण्यात येतील आणि त्या येथे विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रामध्ये त्यांच्या विजेचे वितरण आणि किरकोळ पुरवठ्याच्या कार्याचे नियमन करतील.

## ४ “वितरणाचे क्षेत्र” किंवा “पुरवठ्याचे क्षेत्र”

४.१ मानीव वितरण परवानाधारकाने विजेचा पुरवठा करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेले वीज पुरवठ्याचे क्षेत्र हे भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय (वाणिज्यिक विभाग) यांनी, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४ अंतर्गत निर्गमित केलेल्या एसईझेड अधिसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे, सदर अधिसूचनांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा अटी आणि वगळण्यात आलेल्या बाबी यांच्या अधीन राहून, संपूर्ण क्षेत्र राहील, जे खालील तक्त्यात संक्षिप्तपणे नमूद करण्यात आले आहे :

| अनु. क्र. | राजपत्र अधिसूचनेचा तपशील | अधिसूचनेचा दिनांक | एसईझेडचे क्षेत्र हेक्टर्समध्ये |
|---|---|---|---|
| १ | राजपत्र अधिसूचना क्र. एस. ओ. १८३३ (ई) | २९ डिसेंबर, २००५ | २३.१७९३ |
| २ | राजपत्र अधिसूचना क्र. एस. ओ. २५०१ (ई) | ११ सप्टेंबर, २०१५ | (-१०.७६५७) *निरधिसूचित* |
| **एकूण क्षेत्र** | | | १२.४१३६ |

पुरवठ्याच्या क्षेत्राच्या नकाशामध्ये सदर क्षेत्र अधिक विशिष्टपणे आरेखित करण्यात आले आहे आणि हा नकाशा मानीव वितरण परवानाधारकाने आयोगाकडे सुपूर्द केला आहे. **अनुसूची - १** मध्ये हा नकाशा जोडण्यात आला आहे.

४.२ ‘मे. एसईझेड बायो-टेक’ चा मानीव परवानाधारक दर्जा एसईझेडच्या विकासकाच्या (म्हणजेच सिरम बायो-फार्मा पार्क) मान्यतेशी समवर्ती राहील, म्हणजे जर एसईझेड क्षेत्र अंशत: किंवा पूर्णत निरधिसूचित करण्यात आले तर, ‘मे. एसईझेड बायो-टेक’ अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून संबंधित क्षेत्रासाठी मानीव वितरण परवानाधारक म्हणून असलेला त्याचा दर्जा गमावेल.

४.३ त्याचप्रमाणे, एसईझेडसाठी सह-विकासक म्हणून ‘मे.एसईझेड बायो-टेक’चे निलंबन/समाप्ती किंवा भाडेपट्टीची मुदत संपणे इ. सारख्या घटनांच्या बाबतीत, ‘मे.एसईझेड बायो-टेक’ अशा घटनेच्या दिनांकापासून मानीव परवानाधारक म्हणून असलेला त्याचा दर्जा गमावेल.

४.४ भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाकडून भविष्यात एसईझेड अधिसूचना किंवा निरधिसूचना काढल्यामुळे, एसईझेड क्षेत्रामध्ये बदल झाला तर, किंवा एसईझेडसाठी सह-विकासक म्हणून ‘मे. एसईझेड बायो-टेक’चे निलंबन/समाप्ती किंवा भाडेपट्टीची मुदत संपणे इ. सारख्या घटनांच्या बाबतीत, मानीव वितरण परवानाधारक, अशा घटनेपासून १५ दिवसांच्या आत ‘मे. एसईझेड बायो-टेक’बाबतच्या या विशिष्ट अटींमध्ये सुधारणा/रद्द/निरसन

करण्यासाठी आणि सदर क्षेत्रातील ग्राहकांच्या हितासाठी वीज पुरवठ्याच्या अंतरिम व्यवस्थेबाबत निर्देश मागण्यासाठी, आयोगाशी संपर्क साधेल.

**५. परवान्याची मुदत**

सदर परवाना, अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून, दि. ८ डिसेंबर, २०२३ पासून (म्हणजेच उपरोल्लेखित एसईझेडसाठी 'मे.एसईझेड बायो-टेक'चा मानीव वितरण परवानाधारक दर्जा पटलावर घेण्यासाठी आयोगाने सन २०२३ च्या प्रकरण क्र. १८० मध्ये दिलेल्या आदेशाच्या दिनांकापासून) दि. ७ डिसेंबर, २०४८ पर्यंतच्या पंचवीस (२५) वर्षांच्या कालावधीकरिता किंवा असा परवाना रद्द करण्यात येत नाही तोपर्यंत, यापैकी जे आधी घडेल, त्या कालावधीकरिता अंमलात राहील.

**६. विशिष्ट अटी आणि परवान्याची पाहणी**

हे विनियम अधिसूचित झाल्याच्या दिनांकानंतर त्वरित मानीव वितरण परवानाधारक या विशिष्ट अटी व त्याचा परवाना, मंजुऱ्या किंवा मान्यता जनतेला पाहण्यासाठी पुरविण्याची तरतूद करील.

**७ अखंडीत विजेचा पुरवठा**

मानीव वितरण परवानाधारक त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात दिवसाचे चोवीस (२४) तास अखंडित विजेचा पुरवठा करण्यासाठी व्यवस्था करील.

**८ दुरुस्ती करण्याचे अधिकार**

आयोग, कोणत्याही वेळी, या विनियमांतील कोणत्याही तरतुदीमध्ये बदल, फेरफार, अल्प-बदल आणि सुधारणा करु शकेल.


**९ अडचणी दूर करण्याचे अधिकार**

या विनियमांतील तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण आली तर आयोगाला सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने, विद्युत अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसतील अशा परंतु अडचण दूर करण्यासाठी आवश्यक अशा तरतुदी करता येतील.

डॉ. राजेंद्र गं. आंबेकर
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई
दिनांक : एप्रिल, २०२४

## अनुसूची - १


NORTH
PROCESSING AREA
PROCESSING AREA
TOTAL PROCESSING AREA - 12H 41.36R(30A 26.98G).
NO NON-PROCESSING AREA
प्रवीण चन्द्र
PRAVIN CHANDRA
संयुक्त विकास आयुक्त (पुणे क्लस्टर)
Joint Development Commissioner Pune Cluster
पुणे PUNE
For SERUM BIO-PHARMA PARK
P.C. NAMBIAR
AUTHORIZED SIGNATORY
P.T.O.

STATEMENT OF SEZ AREA AFTER PARTIAL DENOTIFICATION
VIDE S.NO. 2501 (E) DT.11/09/2015
SERUM BIO-PHARMA PARK SEZ, HADAPSAR ,PUNE

| SURVEY NO OF NTF NO. 1126(E) 18.07.06 | SURVEY NO | VILLAGE | FINAL REALINGED SEZ AREA |
|---|---|---|---|
| 1 | 205/2A+2B | HADAPSAR | 0.1398 |
| 2 | 205/1 | HADAPSAR | 0.1182 |
| 3 | 204/6/A2/B2/C2/D2 | HADAPSAR | 0.1411 |
| 4 | 204/5D | HADAPSAR | 0.1000 |
| 5 | 204/5C | HADAPSAR | 0.1141 |
| 6 | 204/5B | HADAPSAR | 0.1160 |
| 7 | 204/5A | HADAPSAR | 0.0829 |
| 8 | 204/4D | HADAPSAR | 0.1052 |
| 9 | 204/4C | HADAPSAR | 0.0995 |
| 10 | 204/4A/1 | HADAPSAR | 0.0831 |
| 11 | 204/4B | HADAPSAR | 0.0320 |
| 12 | 204/3B | HADAPSAR | 0.0865 |
| 13 | 204/3A/2 | HADAPSAR | 0.1518 |
| 14 | 204/2/1 | HADAPSAR | 0.0100 |
| 15 | 204/2/2 | HADAPSAR | 0.2800 |
| 16 | 204/2/3 | HADAPSAR | 0.0000 |
| 17 | 204/2/4 | HADAPSAR | 0.0000 |
| 18 | 204/1B | HADAPSAR | 0.3439 |
| 19 | 203/15/1 | HADAPSAR | 0.3018 |
| 20 | 203/15/2 | HADAPSAR | 0.2100 |
| 21 | 203/14 | HADAPSAR | 0.4888 |
| 22 | 203/13 | HADAPSAR | 0.1158 |
| 23 | 203/13 | HADAPSAR | 0.3480 |
| 24 | 203/12B | HADAPSAR | 0.2780 |
| 25 | 203/12A/1 | HADAPSAR | 0.2456 |
| 26 | 203/12A/2 | HADAPSAR | 0.0000 |
| 27 | 203/8B | HADAPSAR | 0.0000 |
| 28 | 204/7/1 | HADAPSAR | 0.1002 |
| 29 | 204/7/2/2 | HADAPSAR | 0.1538 |
| 30 | 204/7/2/1 | HADAPSAR | 0.2868 |
| 31 | 204/8A/1 | HADAPSAR | 0.0280 |
| 32 | 204/8B/1 | HADAPSAR | 0.0000 |
| 33 | 204/8B/2 | HADAPSAR | 0.0000 |
| 34 | 204/9 | HADAPSAR | 0.0000 |
| 35 | 204/10 | HADAPSAR | 0.0000 |
| 36 | 205/3A | HADAPSAR | 0.0615 |
| 37 | 112/1A | MANJARI | 0.0000 |
| 38 | 112/2B | MANJARI | 0.0000 |
| 39 | 112/2A | MANJARI | 0.0000 |
| 40 | 212/2B/1 | HADAPSAR | 0.0200 |
| 41 | 213/1B | HADAPSAR | 0.2080 |
| 42 | 205/3C/1 | HADAPSAR | 0.1468 |
| 43 | 205/3B | HADAPSAR | 0.1075 |
| 44 | 268/PART | HADAPSAR | 0.0000 |
| 45 | 212/2B/3 | HADAPSAR | 0.3427 |
| 46 | 212/2B/4 | HADAPSAR | 0.2888 |
| 47 | 212/2B/5 | HADAPSAR | 1.7431 |
| 48 | 212/1/3 | HADAPSAR | 0.2358 |
| 49 | 212/1/2 | HADAPSAR | 0.1363 |
| 50 | 212/1/1 | HADAPSAR | 4.0348 |
| 51 | 213/1A/1 | HADAPSAR | 0.4900 |
| 52 | 204/1A | HADAPSAR | 0.0400 |
| 53 | 223/5B | HADAPSAR | 0.0000 |
| 54 | 268/PART | HADAPSAR | 0.0000 |
| TOTAL IN HECTARES | | | 12.4138 |
| TOTAL IN H R | | | 12 H 41.36R |
| TOTAL IN A G | | | 30A 26.98G |

प्रवीण चन्द्र
PRAVIN CHANDRA
संयुक्त विकास आयुक्त (पुणे क्लस्टर)
Joint Development Commissioner Pune Cluster
पुणे PUNE

For SERUM BIO-PHARMA PARK
P.C. NAMBIAR
AUTHORIZED SIGNATORY

| DRAWING TYPE | SEZ LAND USGAGE DRAWING | |
|---|---|---|
| FACILITY | HADAPSAR SEZ | |
| | SERUM BIO-PHARMA PARK | |
| | 212/2 HADAPSAR PUNE 411028 | |
| NORTH | REVISION | D.J. PAJNIGER |
| | R 0 | ARCHITECT (REGN.No.CA/75/0691)<br>UTOPIA SOC. ,FANTACIA 'D' 4TH FLOOR, WANOWRIE<br>TEL.NO. OFFICE : 2699 39 00 RESIDENCE : 2686 33 58 |